महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग**
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖

क्र.मशा/जमीन/अ-०३/ कांदळवन/३१३१७,३१३१९ ते ३१३२२/२०१९ दिनांक : २८/०६/२०१९.

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,३०२ बेक फिल्ड हाऊस, ,
तिसरा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

विषय : Destruction & reclamection of mangroves at Dronagiri Node Taluka Uran Dist.Raigad
**श्री.नंदकुमार वामन पवार रा.ता.उरण जि.रायगड**

संदर्भ :- १) आपलेकडील पत्र क्रं.कक्ष-१/ल.ले./१२४/सन २०१७-१८ दि.२१/०३/२०१८
२) या कार्यालयाकडील पत्र क्र.मशा/जमिन/अ-०३/५३३०६/२०१८ दि.१६/१०/२०१८

वरील संदर्भिय विषयान्वये, श्री.नंदकुमार पवार,रा.उरण यांनी ईमेल संदेशाद्वारे केलेली तक्रार आपणाकडील संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये या कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीत नमूद केलेल्या मूदयांबाबत सविस्तर अहवाल या कार्यालयाकडील दिनांक १६/१०/२०१८ अन्वये, आपले कार्यालयाकडे सादर करणेत आलेला आहे. मात्र सदरचा अहवाल परीपूर्ण नसल्याने फेर अहवाल सादर करणेकामी कळविणेत आलेले आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली असून सदर प्रकरणी खालील प्रमाणे मुद्देनिहायअहवाल सादर करण्यात येत आहे.

**अर्जदार श्री.नंदकुमार पवार यांनी त्यांचे तक्रारीत नमूद केलेला मुद्दा :-** Dastan Phata Jasai, Where almost १०० acres of wetland is reclaimed, Reclamation still continue

**अहवाल :-** दास्तान फाटा लगत जेएनपीटी मार्फत शिवसमर्थ स्मारकाचे काम सुरु आहे. सदरचे काम Progressive Civil Construction Private Limited व Howare Infrastructure Private Limited या दोन कंपन्यांमार्फत सदरचे स्मारकाचे काम केले जात आहे.
श्री.नंदकुमार पवार यांचे तक्रारी नुसार मौजे सावरखार येथील दास्तान फाटा लगत जेएनपीटी प्लॉट नं.१ मध्ये शिवसमर्थ स्मारकाचे काम चालू आहे.त्या ठिकाणी पाहणी केली असता सदर जागे मध्ये आजरोजी शिवसमर्थ स्मारकाचे काम चालू असून स्मारक बांधकामासाठी माती भराव दास्तान फाटा लगत जेएनपीटी प्लॉट नं.१ मध्ये चालू आहे.परंतू सदर जागेमध्ये पूर्वी पासून कांदळवनाची झाडे नव्हती किंवा कांदळवनाची लागवड नाही. आजरोजी सदर ठिकाणी कांदळवनाची तोड झाल्याचे निर्दशनास आले नाही. तसेच तक्रारीमधील क्षेत्र व MRSAC चे नकाशातील कांदळवन क्षेत्र वेगळया ठिकाणी आहेत. सदर तक्रारीचे अनुषंगाने MRSAC कडील नकाशे तसेच Google Image तपासणी केली आहे. सदर प्रकरणी कांदळवनाची तोड अथवा ऱ्हास झालेला नसल्याने तक्रार निकाली ठेवणेस हरकत नाही.

**अर्जदारश्री.नंदकुमार पवार यांनीत्यांचे तक्रारीत नमूदकेलेला मुद्दा :-**At terminal ४ of JNPT, ४५५० mangroves trees (४.५ hectares) have killed needlessly. Forest department and tehsildar

have confirmed the killing of mangroves. This site yet to be visited FIR must be filed against JNPT for Killing of mangroves.

**अहवाल:** - दिनांक १३/०४/२०१८ रोजी जुना हार्वट क्राफ्ट जेटी जवळ (चौथे बंदर) रेल्वे ट्रॅक पुर्वेस कांदळवन प्रभावित जागेचे क्षेत्र ४.५०.०० हे.आर. आहे. सदर क्षेत्रामध्ये कांदळवनाची झाडे उभी असून सुकलेल्या स्थितीत दिसून आली आहेत. सदर झाडे सुकण्याचे कारणाची पाहणी केली असता सदर जागेमध्ये समुद्राचे पाणी येण्याचे बंद झाल्यामूळे पाण्याअभावी सुकल्याचे निर्दशनास आले आहे. याबाबत जेएनपीटी च्या अधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी सदर जागेमध्ये समुद्राचे पाणी जाण्यासाठी नवीन भरावामध्ये ११०० एमएम व्यासाचे दोन पाईप टाकण्यात आले आहेत. सदर पाईपचे मुख्य मातीच्या भरावामूळे (मातीच्या दबावामूळे) वर आलेने मातीमूळे बाधीत झाले आहेत. सदर भरावाचे काम हे भारत मुंबई कंटेनर टर्मीनल प्रा.लि. या कंपनीने केले आहे. सदर कंपनीला समुद्राचे पाणी येण्या जाण्याचा मार्ग मोकळा करुन देण्याबाबत लेखी समज देण्यात आली आहे. तसेच कंपनीने हे काम चालू करुन लवकरात लवकर पुर्ण करण्याची हमी दिली आहे. सदर जागेवर समुद्राच्या पाण्याचा प्रवाह पुर्ववत झालेनंतर सदरची झाडे पुन्हा जगू शकतात असे जेएनपीटीच्या अधिकाऱ्यांनी समक्ष सांगितले. तसेच सदर जागा भविष्यामध्ये अन्य कोणत्याही कारणासाठी उपयोग करण्याचे जेएनपीटीचे प्रयोजन नसल्याचे समक्ष सांगितले.

दिनांक १३/०४/२०१८ रोजी करण्यात आलेल्या स्थळपाहणी नुसार सदर प्रभावित जागेचे क्षेत्र ४.५०.०० हे.आर. असून त्यामध्ये अंदाजे ४५५० झाडेही उभ्या अवस्थेत सुकलेली असल्याचे दिसून येते. त्यापैकी ८२ मॅग्रोव्ह झाडांची वेढी किमान १५ तेकमाल ४० से.मी.इतकी आहे. सदर जागेचा GPS नकाशा तयार केला असून त्यामध्ये अक्षांश-रेखांश ची नोंद घेण्यात आली आहे. सदर प्रभावित विकसित क्षेत्रातील मॅग्रोव्ह झाडे सुकलेली असुन सुकलेली मॅग्रोव्ह बाबत परिक्षेत्र वन अधिकारी उरण यांनी वनगुन्हा नं.जासई रॉगु.नं.८(सी) २६/२०१७/२०१८ दि. १९/०३/२०१८ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. मा. व्यवस्थापक, जेएनपीटी यांनी इनलेट आऊटलेट तात्काळ सुरु करुन सदरची झाडे पुनर्जीवीत करणार असलेबाबतचे पत्र या कार्यालयास सादर केले आहे व त्यानुसार जेएनपीटी मार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी मॅंग्रोव्हची तोड झालेली नसल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आला नाही मात्र सदर प्रकरणी वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे. समुद्राच्या भरतीचे पाणी पुर्ववत सुरु झालेले असल्याने सुकलेली मॅंग्रोव्ह पुनर्जीवीत होत आहेत. सदर तक्रारीचे अनुषंगाने MRSAC कडील नकाशे तसेच Google Image तपासणी केली आहे. सदर प्रकरणी कांदळवनाची तोड अथवा ऱ्हास झालेला नसल्याने तक्रार निकाली ठेवणेस हरकत नाही.

**अर्जदारश्री.नंदकुमार पवार यांनीत्यांचे तक्रारीत नमूद केलेला मुद्दा :-** Coastal road-There are huge patches of mangroves have found dead either side of the coastal road by blocking of tidal water flow.

**अहवाल:** - सदरकामी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने राष्ट्रीय महामार्ग ४ ब लगत नवघर, चाणजे, द्रोणागिरी नोड ते करंजापर्यंत महामार्ग तयार करताना नष्ट होणारे मॅंग्रोव्हबाबत आवश्यक असणारा केंद्र सरकार, पर्यावरण खाते यांचेकडुन दि. ३ फेब्रुवारी २००९ रोजी पर्यावरण दाखला घेतलेला आहे. सोबत पर्यावरण दाखल्याची प्रत जोडलेली आहे. MRSAC कडील नकाशानुसार कांदळवन तोड झाल्याचे आढळून येत नाही. अर्जदार यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी यांचेमार्फत स्थळपाहणी केली असता राष्ट्रीय महामार्ग ४ ब लगत मॅंग्रोव्हची तोड झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत नाही. सदर तक्रारीचे अनुषंगाने MRSAC कडील नकाशे तसेच Google Image तपासणी केली आहे. सदर प्रकरणी कांदळवनाची तोड अथवा ऱ्हास झालेला नसल्याने तक्रार निकाली ठेवणेस हरकत नाही.

**अर्जदारश्री.नंदकुमार पवार यांनीत्यांचे तक्रारीत नमूद केलेला मुद्दा :-** At panja Dongiri २८९H.R. of mangroves stretch may be vanished due to bloking of tidal water flow by construction of concrete wall and installing of sluice gates. Thise stretch can be saved if, will to save, by restoration of tidal water flow.

**अहवाल:** - सदर तक्रारीचे अनुषंगाने मंडळ अधिकरी उरण तसेच परिक्षेत्र वन अधिकारी यांचेमार्फत स्थळपाहणी केली असता, तक्रारीतील क्षेत्र मौजे पाणजे व मौजे डोंगरी या गावचे सुमारे २८९ हे.आर. आहे. सदर ठिकाणी सिडकोने बांधलेला सिमेंट बंधारा व खाडीवरील पुल असून खाडीच्या दोन्ही बाजूस कांदळवनाची झाडे आहेत. सदर तक्रारीचे अनुषंगाने MRSAC कडील नकाशे तसेच Google Image तपासणी केली आहे. सदर प्रकरणी कांदळवनाची तोड अथवा ऱ्हास झालेला नसल्याने तक्रार निकाली ठेवणेस हरकत नाही.

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील अहवालान्वये, वरील प्रमाणे वस्तूस्थितीत निदर्शनास आलेली आहे. तरी वरील प्रमाणे वस्तुस्थिती अर्जदार यांना कळविण्यात यावी, ही विनंती.सोबत MRSAC कडील नकाशे व Google Image जोडले आहे.

(डॉ.विजय सूर्यवंशी)
जिल्हाधिकारी रायगड

जावक
तारीख - 3/7/19
शाखा -
बटवडा - लेखनिक